# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक:30.05.2024** **वार :गुरुवार**

---

**कृषी महाविद्यालय**

पुण्यातील कृषि महाविद्यालयात साहिवाल गाईंच्या संवर्धनाच्या दृष्टीनं संशोधनासाठी माहिती संकलन केंद्र मंजूर झालं आहे. राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी आज ही माहिती दिली. साहिवाल गाईंच्या अनुवंशिक क्षमतेचं संवर्धन, प्रसार आणि अनुवंशिक सुधारणा करणं हा या केंद्राचा प्रमुख उद्देश असल्याचं त्यांनी सांगितलं.

**पिंपरी चिंचवड**

पिंपरी चिंचवड - महापालिकेच्या विविध कर सवलतींचा लाभ घेण्यासाठी मालमत्ता धारकांची कर संकलन कार्यालयात मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या सोयीसाठी उद्या कर संकलन संध्याकाळी सहा वाजेपर्यंत सुरू ठेवण्याचा निर्णय कर आकारणी आणि कर संकलन विभागानं घेतला आहे. महापालिकेच्या वतीने सिध्दी उपक्रमा अंतर्गत महिला बचत गटामार्फत मालमत्ता धारकांना बिलांचं वेळेत वाटप करण्यात आलं. त्यामुळेच कर संकलन विभागाने 2024-25 या आर्थिक वर्षात, पहिल्या पावणेदोन महिन्यातच अडीचशे कोटी रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे.

**दिंडया**

आषाढी वारीसाठी आळंदी आणि देहूमधून निघालेल्या पालखीतील वारकऱ्यांच्या दिंडया 30 जून आणि 1 जुलै रोजी पुण्यात मुक्कामी असणार आहेत. या वारकरी दिंडयांना उतरण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या शाळा मोफत उपलब्ध करून द्याव्यात मागणी शिवसेनेचे माजी गटनेते पृथ्वीराज सुतार यांनी महापालिका आयुक्ताकडे केली आहे.

**बिबट्या**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात असलेल्या माणिकडोह इथल्या एकमेव बिबट्या निवारा केंद्राची क्षमता वाढवण्याच्या कामाला राज्य शासनानं मान्यता दिली आहे. सध्याची निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर या कामासाठीच्या निविदा प्रक्रियेला प्रारंभ होईल. सध्या या केंद्रात 52 बिबटे ठेवण्यात आले आहेत. या केंद्रालगतची जलसंपदा विभागाच्या मालकीची सुमारे 12 हेक्टर जागा वन विभागाला मिळाली आहे. गेल्या 6 महिन्यात या परिसरात बिबट्यांच्या हल्ल्यात किमान 5 जणांना आपला जीव गमवावा लागला आहे.

**कल्याणीनगर**

कल्याणी नगर वाहन अपघाताची माहिती मिळवण्यासाठी पुणे पोलीस प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करणार आहेत. अपघात झाला तेव्हाचा गाडीचा असलेला वेग, वेळ, कितीवेळा हार्ड ब्रेकिंग करण्यात आलं, कितीवेळा वेगाने गाडी

चालवण्यात आली याची माहिती जमा केली जाणार आहे. तसंच गाडीमध्ये इनबिल्ट डॅश कॅमेरा होता, त्याचंही रेकॉर्डिंग मिळवण्यात आलं आहे. या सर्व माहितीचा वापर पुरावा म्हणून केला जाणार आहे.

**जाहीरात फलक**

खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाने आपल्या हद्दीतील अधिकृत जाहीरात फलक लावलेल्या कंपन्यांना, फलकाची देखभाल दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या आहेत. बोर्डाच्या हद्दीत एकही अनधिकृत जाहीरात फलक लावलेला नाही असं प्रशासनानं म्हटलं आहे.

**प्रादेशिक परिवहन**

पिंपरी-चिंचवडमध्ये अनेक रिक्षाचालक योग्यता प्रमाणपत्राशिवाय वाहन चालवत आहेत; मात्र हे बेकायदा आहे. अशा वाहनांवर प्रादेशिक परिवहन विभागाकडून दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. प्रवासी वाहतूक करणाऱ्यांनी आपल्या योग्यता प्रमाणपत्राचं नूतनीकरण करावं आणि कारवाई टाळावी, असं आवाहन पिंपरी-चिंचवडचे प्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल आदे यांनी केलं आहे. दरम्यान वाहन योग्यता प्रमाणपत्रासाठी रिक्षाचालकांवर होणाऱ्या दंडात्मक कारवाईच्या विरोधात रिक्षा पंचायतीतर्फे काल पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ज्येष्ठ नेते डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली निदर्शनं करण्यात आली. हा दंड रद्द केला नाही तर 2 ऑक्टोबरपासून रिक्षाचालकांसह सत्याग्रह करण्याचा इशारा आढाव यांनी दिला.

**टँकर**

पुणे महसूल विभागातील पाचही जिल्ह्यात सध्या 808 टँकरद्वारे सुमारे 14 लाख लोकांना पाण्याचा पुरवठा केला जात आहे. त्यातील सर्वाधिक म्हणजे 292 टँकर पुणे जिल्ह्यात सुरु असून जिल्ह्यातील 191 गावं आणि 1408 वाड्या वस्त्यांमधील सुमारे 4 लाख 20 हजार नागरिकांना आणि अडीच लाखाहून अधिक पशुधनाला टँकरमधून पाणी पुरवठा सुरु आहे. पुण्यापाठोपाठ सातारा जिल्ह्यात 204 तर सोलापूर जिल्ह्यात 203 टँकर सुरु आहेत.

**क्रिकेट**

पुण्यात 12 वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब क्रिकेट स्पर्धा सुरू आहेत. या स्पर्धेत एसएआरके क्रिकेट ॲकॅडमीने पुणे पोलिस बॉईज संघाचा 26 धावांनी पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली. अन्य एका सामन्यात व्हेरॉक वेंगसरकर ॲकॅडमीने ब्रिलीयंट्स क्रिकेट ॲकॅडमीचा 4 गडी राखून पराभव करून अंतिम फेरी गाठली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 35 अंश तर किमान तापमान 24 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल तसंच हवामान अंशतः ढगाळ राहण्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**